## नियमित दिवाणी मुकदमा क्र.६३/२०१६ मधील नि. क्र.९८ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ११ याने त्यास अर्ज नि.क्र.५० वरील दिनांक १७.०७.२०१७ रोजीच्या आदेशाप्रमाणे विहीत वेळेत खर्चाची रक्कम भरता आली नाही, करीता, खर्च देणेस झालेला विलंब माफ करुन मिळावा, यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ११ असे कथन करतो की, प्रतिवादी याने नि.क्र.५० ला अर्जाने दाव्याकामी कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. ११ चा नि.क्र.५० चा अर्ज दिनांक १७.०७.२०१७ रोजीच्या आदेशान्वये र. रु. ३००/– च्या खर्चावर मंजूर केला आहे, परंतु, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ११ चे कुलमुखत्यार हे कैफियत दाखल केल्यानंतर बरेच दिवस आजारी होते. तसेच, त्यांना मानसिक त्रास होत होता. तसेच, त्यांना हिंडता फिरता येत नव्हते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ११ चे कुलमुखत्यार हे न्यायालयात नेमून दिलेल्या तारखेस बरेच दिवस न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. करीता, नि.क्र.११ वरील आदेशान्वये खर्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वेळेत देऊ शकले नाहीत. प्रतिवादी क्र. ११ हे आज रोजी नि.क्र.५० वरील आदेशान्वये झालेल्या खर्चाची रक्कम देण्यास तयार आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असून दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ११ ची खरेदी मालकी हक्काने कब्जे वहिवाट आहे. जर प्रतिवादी क्र. ११ यांचे नि.क्र.५० वरील आदेशान्वये झालेल्या खर्चाची रक्कम भरण्यास संधी दिली नाही, तर प्रतिवादी क्र. ११ चे न्यायहक्क डावलले जाऊन प्रतिवादी क्र. ११ याचे न भरुन येणारे असे फार मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ११ यांना नि.क्र.५० वरील आदेशान्वये झालेल्या खर्चाची रक्कम रुपये ३००/– भरणेस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे व आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ११ चा प्रस्तुत अर्ज मंजूर करणेत यावा, अशी प्रतिवादी क्र. ११ ने विनंती केली आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करून प्रतिवादी क्र. ११ चे अर्जातील कथनांवर आक्षेप नोंदवला आहे. ते असे कथन करतात की, नि.क्र.५० वरील दिनांक १७.०७.२०१७ रोजी खर्चाचा आदेश पारीत केलेला होता. त्यानंतर

वादी यांनी दाव्यात पुरावा देवून सदरचा दावा अंतिम युक्तिवाद करणेसाठी नेमलेला आहे. तोपर्यंत प्रतिवादी क्र. ११ याने अर्ज नि.क्र.५० प्रमाणे झालेल्या आदेशान्वये कोणतीही खर्चाची रक्कम न्यायालयात जमा केलेली नाही अथवा वादीस दिलेली नाही. करीता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करता येणार नाही व अर्ज रद्दबातल होणेस पात्र आहे, अशी वादींनी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. ११ व वादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. प्रस्तुत अर्ज व प्रतिवादी यांचे म्हणणे वाचले. वादीच्या दाव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप, पृथ्थक कब्जा व वादी व प्रतिवादी यांच्या हिश्याची फाळणी होवून त्याची मोजणी होवून नकाशे करणेचा आदेश पारीत करणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखावरुन असे दिसून येते की, अर्ज नि.क्र.५० वर दिनांक १७.०७.२०१७ रोजी आदेश पारीत करणेत आलेला आहे व प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ११ यांनी दिनांक २७.०१.२०२६ रोजी अभिलेखात दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ११ यास प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस ७ वर्षे सहा महिन्यांचा विलंब झालेला आहे. माझ्या मते, प्रतिवादी क्र. ११ चा प्रस्तुत अर्जात नमूद केलेली मागणी मान्य केल्यास, त्यास त्याची बाजू प्रस्तुत प्रकरणात मांडण्याची संधी मिळेल. प्रस्तुत अर्ज मंजूर केला तर नक्कीच प्रतिवादी क्र. ११ यास त्याची लेखी कैफियत अभिलेखात दाखल करणेची परवानगी मिळेल व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणे शक्य होईल. प्रतिवादी क्र. ११ याचे अर्ज नि.क्र. ५० वरील आदेशाची पुर्तता करणेस नक्कीच फार विलंब झाला आहे. सदय परीस्थितीत दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ अन्वये दिलेल्या ताकतीचा वापर करुन अर्ज मंजूर केल्यास, तसेच, वादीस प्रतिवादी क्र. ११ याने खर्च देवून त्यांचे नुकसान भरुन काढणे क्रमप्राप्त ठरते. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्च र. रु. ५०० (र. रु. पाचशे) सह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ११ याने वादीस पूर्वीच्या अर्जाच्या खर्चाची रक्कम ३००/- व प्रस्तुत अर्जाच्या खर्चाची रक्कम ५०० वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. ११ याची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2026.02.11 12:28:26 +0530

दि.२७.०१.२०२६ (एस. पी. सैय्यद)

वडूज. २रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.